# ठाणे महानगरपालिका, ठाणे

जा.क्र.ठामपा/आस्था/उपआ(मु.)- ९३९५
दिनांक : १७/०६/२०१९

-: परिपत्रक :-

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील " सुतार (पाणी पुरवठा विभाग) " या संवर्गातील कर्मचा-यांची अंतिम सेवाज्येष्ठता यादी शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११ नुसार तयार करुन प्रसिध्द करण्यात येत आहे.

सन २०१८ मध्ये नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहीत मार्गाने कर्मचा-यांची नियुक्ती झालेली नसल्याने सदर संवर्गाची निरंक प्रारुप सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

ही अंतिम सेवाज्येष्ठता सुची ही, मा.सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य न्यायालयात दाखल केलेल्या किंवा होणा-या याचिकांमधील निर्णयामुळे तसेच अन्य शिफारशीमुळे या ज्येष्ठता सुचित बदल करावा लागल्यास त्या निर्णयाच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

सर्व संबंधित विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, ही अ.क्र.१ ते १ कर्मचा-यांची अंतिम सेवाज्येष्ठता यादी त्यांच्या विभागातील "सुतार (पाणी पुरवठा विभाग)" संवर्गातील कर्मचा-यांना तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी व त्याबाबत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द देण्यात यावी. संबंधित विभागप्रमुख/ खातेप्रमुख यांनी माहितीसाठी सेवाज्येष्ठता यादया प्रसिध्द कराव्यात व संबंधित कर्मचा-यांची स्वाक्षरी घेऊन तसे प्रमाणपत्र मुख्य आस्थापना विभागाकडे पाठवावे.

सदरची सेवाज्येष्ठता यादी ठाणे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी.

(ओमप्रकाश दिवटे)
उपआयुक्त (मुख्यालय)
ठाणे महानगरपालिका,ठाणे